अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,१९९५ नुसार राज्य निवडणूक आयोग कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांवर शारिरीकदृष्टया अपंगांसाठी केंद्र शासनाने अपंगांच्या पद निश्चितीबाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय,क्र.संकीर्ण-२०१०/५०५/प्र.क्र.११६/३७

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

दिनांक : २० जानेवारी,२०११

वाचा : १) अपंग व्यक्ती ( समान संधी,संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, अधिनियम,१९९५,( क्रमांक १/१९९६)

२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक : एसआरव्ही-१०९७ / प्र.क्र.१२/९७/१६-अ, दिनांक २/५/१९९८

३) शासन निर्णय,क्रमांक-संकीर्ण-२००५/३०१/प्र.क्र.१२/०५/३७, दिनांक १८/८/२००५,

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-२००९/प्र.क्र.५/सुधार-३,दिनांक ३/८/२०१०

प्रस्तावना :-

अपंग व्यक्ती (समान संधी,संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,१९९५ ( १९९६ चा क्रमांक १) अन्वये अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत ३ टक्के पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे.त्यानुसार या विभागाच्या अखत्यारीतील राज्य निवडणूक आयोग कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड मधील पदांवर शारीरिकदृष्टया अपंगांसाठी आरक्षण ठेवण्याकरिता पदनिश्चिती संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये करण्यात आली होती.

२. शासनाच्या विविध विभागामार्फत अपंगांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या पदनिश्चितीमध्ये एकवाक्यता नाही किंवा ती परिपूर्ण नाही,यासाठी अपंग व्यक्तींसाठी सुधारित पद निश्चिती करणे व त्या अनुषंगाने अपंगांची राखीव पदे भरणे या संदर्भात मा. उच्च न्यायालय,मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक २२५/२००९ दाखल करण्यात आली आहे. या याचिकेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करण्याबाबतचे निदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ३/८/२०१० च्या शासन निर्णयान्वये सूचित केल्याप्रमाणे या विभागाच्या अखत्यारीतील राज्य निवडणूक आयोग कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच,अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :**

मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २२५/२००९ संदर्भात शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करण्याबाबतचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिले असल्याने उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक १८ऑगस्ट,२००५ चा शासन निर्णय या शासन निर्णयाच्या परिशिष्ट "अ" येथे नमूद पदांकरिता रदद करण्यात आल्याचे समजण्यात यावे.

२. संदर्भ क्रमांक ३ येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३/८/२०१० च्या शासन निर्णयानुसार सूचित केल्याप्रमाणे राज्य निवडणूक आयोग कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड मधील कोणत्या पदासाठी कोणत्या वर्गवारीतील अपंग व्यक्तीसाठी आरक्षण ठेवावे याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) अपंग व्यक्ती (समान संधी,संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,१९९५ ( १९९६ चा क्रमांक १)या अधिनियमातील कलम ३२ व ३३ नुसार राज्य निवडणूक आयोग कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांवर या शासन निर्णयाच्या परिशिष्ट"अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्केपर्यंत फक्त सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण ठेवण्यात यावे.

२) विहीत मार्गाने सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांकरिता अपंग उमेदवारांसाठी शारीरिक पात्रतेचे निकष सोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणे असतील. विहीत मार्गाने उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांस शारीरिक पात्रतेसंदर्भात,संबंधित विषयाच्या तज्ञांचा समावेश असलेल्या वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केल्यानंतरच,अशा अपंग व्यक्तीची शासन सेवेत संबंधित संवर्गात खाली दर्शविलेले निकष विचारात घेऊन नियुक्ती करण्यात येईल.

अ) संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार अर्हताधारक असेल तर

ब) त्या त्या संवर्गातील कर्तव्ये व जबाबदा-या लक्षात घेऊन त्याप्रमाणे
वैद्यकीय मंडळाने सक्षम ठरविल्यास,

क) पदोन्नतीच्या पदास व एकाकी पदास अपंगांचे आरक्षण लागू नाही.

३. अपंग व्यक्तींना शासकीय नियुक्तीकरिता योग्य ठरविलेल्या पदांवर सरळसेवेने नियुक्ती देण्याबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०९९/ प्र.क्र.३७/९९/१६-अ,दिनांक ४/३/२००२ नुसार क्रमवार बिंदूनामावली व कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

४. सदर आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५.          सदर शासन निर्णय,महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०१२११४१२२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि.द.शिंदे)

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

**सोबत** : परिशिष्ट "अ"

प्रत,

महालेखापाल,महाराष्ट्र-१,(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा),मुंबई,
महालेखापाल,महाराष्ट्र-२,(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा),नागपूर,
आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर,
प्रधान सचिव,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशान भवन,मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
सामान्य प्रशासन विभाग,कार्यासन-१४/१४-अ/१४-ब/१९-अ,मंत्रालय,मुंबई,
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रिडा व विशेष सहाय्य विभाग/सुधार-३,
मंत्रालय,मुंबई (५ प्रती),
मा.प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई
सहसचिव (सेवा)/उप सचिव (प्रशासन)/कार्या-१९,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी,मुंबई,
निवडनस्ती/कार्यासन-३७

**शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक - संकीर्ण-२०१०/५०५/प्र.क्र.११६/३७, दिनांक २० जानेवारी,२०११ चे सहपत्र**

## परिशिष्ट

गट-"अ" ते "ड" संवर्गातील पदांवर सरळसेवेने भरती करण्यासाठी अपंग उमेदवारांसाठी अपंगत्व पात्रतेचे निकष :

| अनुक्रमांक | पदाचे नाव | शारीरिक पात्रता | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| | | **राजपत्रित गट - "अ"** | |
| १ | विधी अधिकारी | S, ST, C, RW, H | OL, BL, OAL, B, LV |
| | | **राजपत्रित गट - "ब"** | |
| २ | सांख्यिकी अधिकारी | S, W, SE, ST, RW | OA, OL, HH, B, LV |
| ३ | कक्ष अधिकारी | S, ST, RW, H | OA, OL, B, LV |
| | | **अराजपत्रित गट - "क"** | |
| ४ | लघुलेखक(उच्चश्रेणी) | ----- | B / LV |
| ५ | रोख लेखापाल | S, ST, BN, MF, SE, RW, C | OA, OL, OAL, BL, HH |
| ६ | सहाय्यक | S, ST, W, RW, H, C | OA, OL, BL, OAL, B, LV, HH |
| ७ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ------ | B / LV |
| ८ | रोखपाल | S, W, MF, SE, RW, H, C | OA, BL, OL, MW |
| ९ | लिपिक-टंकलेखक | S, ST, W, L, MF, SE, RW, H, C | OA, OL, BL, OAL, B, LV |
| १० | वाहनचालक | अपात्र | अपात्र |
| | | **अराजपत्रित गट - "ड"** | |
| ११ | शिपाई | S, ST, W, F, PP, L, KC, B, SE, H | OL, HH, LV, B |

ABBREVATIONS USED : S=Sitting , BN=Bending, SE=Seeing, RW=Reading & Writing, C=Communication, MF=Manipulation by Fingers, PP=Pulling & Pushing, L=Lifting, KC=Kneeling & Croutching, ST=Standing, W=Walking, BLA=Both Legs & Arms, BA=Both Arms, OL=One Leg, BL=Both Leg, OA=One Arm, OAL=One Arm and One Leg, B=Blind, LV=Low Vision, H=Hearing, MW=Muscular Weakness.

OH=Orthopaedically Handicapped, CP=Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, VH=Visually Handicapped, HH=Hearing Handicapped.